महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९
☎: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)
www.midcindia.org

क्रमांक: मऔविम/मव्य(भूमी)/पी५८५६४ दिनांक: १२.०७.२०२४

# परिपत्रक

**विषय: प्राधान्य सदराखाली भूखंड वाटपाबाबतच्या धोरणात सुधारणा करणेबाबत (अवकाश संशोधन).**

अंतराळ संशोधन आणि विकास हे वैज्ञानिक संशोधन, राष्ट्रीय प्रतिष्ठा, विविध राष्ट्रांना एकत्र आणणे, मानवतेचे भविष्यातील अस्तित्व सुनिश्चित करणे तसेच इतर देशांविरुद्ध लष्करी व सामरिक फायदे विकसित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे क्षेत्र आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) ही भारताची राष्ट्रीय अंतराळ संस्था असुन सदर संस्था, भारत सरकारच्या Department of Space (DoS) यांची प्राथमिक संशोधन आणि विकास शाखा म्हणून कार्यरत आहे. ISRO मार्फत प्रामुख्याने अंतराळ-आधारित कार्ये, अंतराळ अन्वेषण, आंतरराष्ट्रीय अंतराळ सहकार्य आणि संबंधित तंत्रज्ञानाच्या विकासाशी संबंधित कार्ये करण्यात येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, अवकाश संशोधनासाठी यंत्रसामुग्री बनविणा-या उद्योजकांना महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये प्राधान्याने जागा वाटप करणे आवश्यक असल्याने महामंडळाच्या मा. सदस्य मंडळाच्या दिनांक १३.१२.२०२३ रोजी झालेल्या ३९८ व्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ६७०९ पारीत करण्यात आला आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

महामंडळाच्या दिनांक १९.१२.२०१२ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद प्राधान्य क्षेत्रांव्यतिरीक्त **अवकाश संशोधनासाठी यंत्रसामुग्री बनविणा-या उद्योजकांना** महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात यावे.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

12.07.24

( अनिल भंडारी भा.प्र.से. )
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.

(२) मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / छत्रपति संभाजीनगर / नागपूर

(३) महाव्यवस्थापक (भूमी/विधी/भूसंपादन/मा व तं/ जनसंपर्क/म.ब.वि./डीएमआयसी/ पणन)

(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,

(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,

(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,

(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपति संभाजीनगर/ नागपूर.

(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,

(९) सर्व औद्योगिक संघटना

(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in